

ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)


रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता.चांदवड जि.नाशिक फोन नं.ः-२५२३३०



रजि.नं.ः एनएसके /सीएचडी/आरएसआर/सीआर/८४० दि.२९/०५/२००१


सुरक्षितता, विश्वासार्हता, आणि तत्परता यांचा त्रिवेणी सुरेख संगम

## ❖संचालक मंडळ ❖

### संस्थापक ः- श्री.प्रा.निकम टी.पी.

| | |
|---|---|
| श्री.दत्तात्रेय काशिनाथ गांगुर्डे | चेअरमन |
| श्री.राजेंद्र तुकाराम शेलार | व्हा.चेअरमन |
| श्री.तुकाराम पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री.डॉ.अरूण पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री.देविदास त्रंबकराव शेलार | संचालक |
| सौ.रेखा विलासराव महाजन | संचालिका |
| श्री.नंदकुमार पुंडलिकराव शेलार | संचालक |
| श्री.अशोक शामराव माळी | संचालक |
| श्री.सुरेश पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री.गोपीनाथ मुरलिधर खैरे | संचालक |
| श्री.केद्रु फकिरा गांगुर्डे | संचालक |
| श्री.उमरावसिंग रघुनाथसिंग परदेशी | संचालक |
| श्री.रामदास सदाशिव साळवे | संचालक |
| श्री.किशोर दशरथ शेलार | स्विकृत संचालक |
| श्री.सुभाष माधव शेलार | स्विकृत संचालक |
| श्री.डॉ.पंडितराव ज्ञानदेव विधाते | जनसंपर्क अधिकारी |
| श्री.अण्णासाहेब हरीभाऊ माळी | बँक प्रतिनिधी |

### कर्मचारी वृंद

| | |
|---|---|
| श्री.सतिश मुरलीधर आहेर | प्र.मॅनेजर |
| श्री.गजेंद्र बाळू शेलार | लिपीक |
| श्री.राजेश सुभाष व्यवहारे | कॅशियर |
| श्री.सुशिल दिगंबर पंडीत | शिपाई |

**कायदेशीर सल्लागार**

ॲड.श्री.शिवाजीराव महाद्रु सोनवणे

**चार्टड अकौंटन्ट**

श्री.एस डी.ठाकरे

**वाहन व्हॅल्युअर**

श्री.अभयकुमार आर.मेहता, मालेगाव



ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता.चांदवड जि.नाशिक फोन नं.:-२५२३३०

रजि.नं.: एनएसके /सीएचडी/आरएसआर/सीआर/८४० दि.२९/०५/२००१

१६ वी

## ❖ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ❖

**फक्त सभासदांसाठीच**

**जा.क्र.वा.स.सन.२०१७** **दि.३१/०७/२०१७**

आपल्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची **"वार्षिक सर्व साधारण सभा" रविवार दि.२०/०८/२०१७ रोजी सकाळी ११.००वा. चंद्रभागा लॉन्स गणुर रोड चांदवड.** येथे आपल्या संस्थेचे **चेअरमन मा.श्री.दत्तात्रेय गांगुर्डे** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी बोलविण्यात येत आहे.तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती!

### सभेपुढील विषय

१) मा.नियोजीत अध्यक्षांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.

२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वृत्त वाचून कायम करणे.

३) सन २०१६-२०१७ सालाचे नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद व संचालक मंडळाचा अहवाल वाचुन कायम करणे.

४) सन २०१६-२०१७ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

५) सन २०१७-२०१८ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६) सन २०१६-२०१७ च्या वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाला मान्यता देणे.

७) सन २०१६-२०१७ वर्षाचे ऑडीट मेमोचे वाचन करून दोष दुरूस्तीस मंजुरी देणे.

८) सन २०१७-१८या वर्षाकरिता लेखापरिक्षकाची नेमणुक करणेबाबत

९) उप समितीच्या अहवालावर चर्चा करणे बाबत.

१०) मा.अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणेबाबत.

**आपले नम्र**

| | | |
|---|---|---|
| **श्री.सतिश आहेर** | **श्री राजेंद्र शेलार** | **श्री. दत्तात्रेय गांगुर्डे** |
| प्र.मॅनेजर | व्हा.चेअरमन | चेअरमन |

**मा.संचालक मंडळ**

**सुचना**

१) ज्या सभासदांना माहिती हवी असेल अगर काही सुचना करावयाच्या असतील त्यांनी दि.११/०८/२०१७ पर्यंत लेखी कळवावे.

२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर कोरम असो वा नसो सभेचे कामकाज पुर्ण करण्यात येईल.



ऋणातून समृध्दीकडे

**महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)**

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता.चांदवड जि.नाशिक फोन नं.ः-२५२३३०

रजि.नं.ः एनएसके /सीएचडी/आरएसआर/सीआर/८४० दि.२९/०५/२००१

# सन २०१६ - २०१७चा वार्षिक अहवाल

सस्नेह नमस्कार ......

सर्व सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो ,

**आज १६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी** आलेल्या सर्व सन्माननीय सभासदांचे महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपुर्वक स्वागत करतो.दि.३१/०३/२०१७ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या प्रगतीचा आलेख मांडण्यासाठी मी आपल्या समोर उभा आहे.नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

चांदवड तालुक्यातील सर्व सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवून मोलाचे सहकार्य केले.ठेवीदारांच्या व सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतलेली आहे. संस्थेला सलग ६ वर्षे “अ तारांकीत” तर १० वर्ष “अ” ऑडीट वर्ग मिळालेला आहे.हया वर्षात संस्थेने सोळा वर्ष पुर्ण केले आहे.१६वर्षाच्या अल्पकालावधीत संस्था स्वयंपुर्ण झालेली असुन आर्थिक दृष्टया मजबुत आहे. चांदवड तालुक्यातील ही एक अग्रगण्य व शिस्तबध्द, प्रभावी प्रशासन असलेली संस्था म्हणून **महात्मा फुले नागरी सह.पतसंस्थेला** तालुक्यात ओळखले जाते. सुरूवातीपासून संस्थेच्या सर्व व्यवहारात नियोजन बध्दता, पारदर्शकता, तत्परता, विश्वासार्हता व आर्थिक शिस्ती बरोबर कार्यालयीन शिस्त राखण्याचे काम संचालक मंडळाने केलेले आहे. चांदवड तालुक्यातील अनेक नामांकित पतसंस्था व बँका आहे. त्यांच्याशी निर्मळस्पर्धा करून, दुष्काळ, आर्थिक मंदी, व गारपीट, नोटाबदली तसेच महाराष्ट्र सहकार खात्यांनी लादलेले निर्बंध या सर्वांना सक्षमपणे सामोरी जावून संस्थेने गरजु व होतकरू तरूणांना, व्यावसायिकांना कर्जवाटप केले

आहे.सभासदांनी देखील आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविल्यामुळे आम्ही ९८% कर्जवसुली करू शकलो ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे.म्हणुन सभासदांना मी धन्यवाद देतो व असेच सहकार्य मिळो अशी आपेक्षा करतो.

**"महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था"** ही अंतर -बाहय सुंदर व आर्थिक दृष्टया सक्षम असलेली तालुक्यातील एकमेव संस्था आहे.या श्रेयाचे मानकरी संचालक मंडळ असले तरी खरे श्रेयाचे मानकरी हे सन्माननीय सभासद आहे.त्यांच्याच सहकार्यामुळे संस्थापक प्रा.निकम टी.पी. यांच्या स्वप्नांना मुर्त स्वरूप आले आहे.संस्थेच्या आजपर्यंतच्या या प्रगतीचे, संस्थेला नावारूपाला आणून उत्तुंग शिखरावर पोहचविण्याचे खरे काम संस्थापक प्रा.निकम टी.पी.यांनी केले आहे व करीत आहे.

संस्थेच्या प्रगतीचे १६वर्षाचे माहिती पत्रक आपणास दिले आहे,गेली १६वर्षापासुन आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीचा आलेख वेगाने उंचावत आहे.या वर्षी देखील सस्थेला 'अ' ऑडीट वर्ग मिळालेला असुन वेटेज ॲव्हरेज पध्दतीनुसार १००पैकी ८२ गुण मिळालेले आहे.गुणात्मक दृष्टया आपली पतसंस्था नंबर १ आहे हेच आपल्या पतसंस्थेचे खास वैशिष्टये आहे,असेच आपले सर्वांचे सहकार्य राहील अशी आशा बाळगतो.संस्था याच वेगाने विकासाच्या दिशेने उंच भरारी घेईल अशी मी संचालकांच्या वतीने ग्वाही देतो.पुनःश्च एकदा आपले मनःपुर्वक हार्दिक स्वागत करून आपल्या शुभेच्छा हृदयाशी बाळगून १६वा वार्षिक अहवाल आपणापुढे सविनय सादर करीत आहे.

**भागभांडवल :-**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल ५० लाख रूपये असून दि.३१/०३/२०१७ अखेर संस्थेचे एकुण सभासद संख्या २७५ आहे. वसूल भागभांडवल २०,५५,७५०=०० रूपये आहे .अहवाल सालात भाग भांडवल रूपये ७४,१००=०० वाढले म्हणजे शेकडा प्रमाण ३.७४% ने वाढ झालेली आहे.

## राखीव व इतर निधी :-

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व स्थैर्याची कल्पना तिच्या एकूण निधी वरून लक्षात येते. कारण राखीव व इतर निधी हाच संस्थेचा आत्मा आहे. दि.३१/०३/२०१७ अखेर संस्थेचा निधी रूपये १,१७,६३,३७३.०२ असून अहवाल वर्षात निधीमध्ये रूपये १४,२३,०६३=00 शेकडा प्रमाण १३.७६ ने वाढ झालेली आहे.

## ठेवी :-

संस्थेचे पारदर्शी कामकाज व संस्थेवरील दृढ विश्वास यामुळे अनेक हितचिंतक व स्नेही बांधवांनी उत्स्फुर्तपणे ठेवी ठेवल्यामुळे ठेवीमध्ये प्रतिवर्षी वेगाने वाढ होत आहे. ही संस्थेच्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट आहे. या वर्षाअखेर संस्थेच्या ठेवी रूपये ५,९४,०३,७०२=00 इतक्या आहे. सदर ठेवी मधे गत वर्षाच्या तुलनेत २०,४४,८११=५२ ने वाढ झालेली आहे. ही पतसंस्थेच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब आहे. सदर ठेवी अत्यंत सुरक्षीत आहे असे मी चेअरमन या नात्याने आपणांस सांगू इच्छितो.

## कर्ज वाटप :-

संस्थेने व्यापारी, शेतकरी, शेतमजूर,कामगार,मजूर,नोकरवर्ग,उदयोजक इत्यादी सर्व गरजू होतकरू लोकांना 'अ' वर्ग व 'ब' वर्गातून कर्ज वाटप केलेले आहे. कर्ज वाटप करतांना कर्जदारावर अवलंबून असलेल्या व्यक्ती, परत फेडीची आर्थिक क्षमता, त्यांची विश्वासार्हता व गुणात्मक कसोटीच्या आधारे रूपये ४,७३,०६,२०४=00 इतके कर्ज वाटप केलेल आहे. गतवर्षाच्या तुलनेत कर्जवाटपात रूपये १२,५७,२०४=00 ने वाढ झालेली आहे.

## थकबाकी :-

थकबाकी वसूल करणे हे पतसंस्थेच्या कामकाजातील सर्वात कठीण काम आहे. परंतु वसुली हा संस्थांचा आत्मा असून त्यावर संस्थेचे अस्तित्व व विकास अवलंबून असतो. संस्थेचे संस्थापक प्रा. निकम टि.पी. व कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न व सभासदांनी दिलेली मोलाची

साथ यामुळे दि.३१/०३/२०१७ अखेर ९८% इतकी कौतुकास्पद कर्जवसुली केली आहे.थकबाकी असलेल्या सभासदांवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. यापुढेही सर्व कर्जदार सभासदांनी असेच सहकार्य करावे अशी मी विनंती करतो.एन.पी.ए.ची तरतुद पूर्णपणे केलेली असून संस्थेचे एन.पी.ए.चे प्रमाण ४% इतके आहे. संस्थेचा सी.डि.रेशो सलग ६६ % असुन तो आदर्श सी डि रेशो समजला जातो.

**गुंतवणूक :-**

सहकार खात्याने पतसंस्थेला घालून दिलेल्या सी.डी.रेशोचे आपल्या पतसंस्थेने पूर्णपणे पालन केलेले आहे. संस्थेने नियोजनपूर्वक पध्दतीने रूपये १,९५,३४,६११=00 रूपयांची गुंतवणूक केलेली आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या ९ सभा झालेल्या असुन संचालकांनी स्वतःची कामे बाजुला ठेवुन संस्थेच्या विकासासाठी कमाल वेळ दिलेला आहे म्हणुन संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. यापुढेही असेच सहकार्य मिळेल अशी मी आपेक्षा बाळगतो .

**नफा:-**

गुणात्मक कर्ज वाटप व कमाल कर्जवसुली, खर्चात काटकसर, कुशल व्यवस्थापन व कौशल्यपूर्ण गुंतवणूक या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे या वर्षात संस्थेला १२,२0,000=00 रूपये निव्वळ नफा झालेला आहे. या वर्षी संस्थेने १२,२0,000=00 रूपयांच्या नफ्यातुन उपविधीच्या अधिन राहुन नियमाप्रमाणे सर्व प्रकारच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहे.प्रतिवर्षी वाढता नफा संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद गोष्ट आहे .

**कर्मचारी परिवार :-**

आपल्या संस्थेस अतिशय कार्यक्षम,प्रामाणिक व समर्पित भावनेने प्रेरित असे ५कर्मचारी वर्ग लाभलेले आहे .संस्थेच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सस्थेच्या विकासावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून संस्थेतील कर्मचारी परिवाराने ध्येयाने प्रेरित होपून निष्ठेने व प्रामाणिकपणे





काम करावे कारण आपणांस विकासाचा अजून बराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे.

**लेखा परिक्षण :-**

संस्थेच्या लेखा परिक्षणावरून संस्थेचे खरे चिज समजते. संस्थेला गेली ६ वर्षापासुन सतत "अ स्टार" ऑडीट वर्ग मिळालेला आहे . तर १० वर्ष 'अ' ऑडीट वर्ग मिळालेला आहे. या वर्षी वेटेज ॲव्हरेज १०० पैकी ८२% गुण मिळवून संस्थेने चांदवड तालुक्यात प्रतिष्ठा मिळविली आहे. याचा आपणा सर्वांना आभिमान वाटावा .

**आभार :-**

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीत सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. मा. सहाय्यक निंबधक सो. सौ. शेळके मॅडम ,सहकार व बॅकिंग क्षेत्रातील सर्व अधिकारी, श्री. शिवाजीराव सोनवणे (कायदेशिर सल्लागार), श्री. ठाकरे एस डी (सी. ए.), संस्थेचे वाहन व्हॅल्युअर श्री. अभयकुमार मेहता (मालेगांव), सहकार, राजकीय , शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपला बहुमुल्य वेळ देवून संस्थेला वेळोवेळी मार्गदशन केले, भेटी देवून सुचना केल्या त्यांचेही मनःपूर्वक आभार मानतो.

॥ जय हिंद...! ॥

आपला स्नेहांकित,

(मा. दत्तात्रेय गांगुर्डे)

चेअरमन

# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.चांदवड
## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०१७ अखेर

| भांडवल व देणी | | मालमत्ता व येणी | |
|---|---|---|---|
| **भागभांडवल** | **२०५५७५०.००** | रोख शिल्लक | ८१४९.०० |
| वसुल भागभांडवल | २०५५७५०.०० | **बँक** | **९६२३०५९.५४** |
| **ठेवी** | **५९४०३७०२.५२** | एन डी सी सी बँक चालु खाते | ७७७९६८.०० |
| मुदत ठेव खाते | २५३६४९४५.०० | एन डी सी सी बँक सेव्हींग खाते | १२३४३.०० |
| अल्पबचत ठेव खाते | ३८६९०.०० | नामको बँक चालु खाते शाखा चांदवड | १७०८१९८.७५ |
| बचत ठेव खाते | १०५८८९७२.५२ | स्टेट बँक शाखा चांदवड चालु खाते | १९६२७४४.६७ |
| दामदुप्पट ठेव | ८३७८०.०० | दि चांदवड मर्चन्टस् बँक चालु खाते | ८२७२९२.६१ |
| जेष्ठ नागरीक ठेव योजना | २३३२७३१५.०० | कार्पोरेशन बँक बचत खाते चांदवड शाख | ६२२६९६.०० |
| **निधी** | **८६८८१०२.३७** | कार्पोरेशन बँक चालु खाते चांदवड शाख | ३७११८१६.५१ |
| राखीव निधी | २०८०३५९.९५ | **गुंतवणुक** | **१९५३२६११.००** |
| इमारत निधी | ३२०३९४४.५० | नामको बँक मुदत ठेव चांदवड शाखा | ८२५०६२०.०० |
| सभासद लाभांश समिकरन | १४३१६.०० | लॉकर डिपॉझिट | २०३५०.०० |
| सभासद कल्याण निधी | ६८२५८.०० | रिझर्व्ह फंड एन डी सी सी बँक | १५१९४९१.०० |
| विमा निधी | ७६९०१४.५० | इमारत फंड खाते एनडीसीसी बँक चांदवड | ७२२६.०० |
| संशयीत व बुडित कर्ज निधी | १३५१७९१.१० | नाशिक जि पत फेडरेशन शेअर्स | ५००.०० |
| वोर्ड व स्टाप ट्रेनिंग फंड | ६०७४०.०० | महा.राज्य पतसंस्था फेडरेशन शेअर्स | ३०००.०० |
| फर्निचर निधी | ५६९१२५.०० | नाशिक जि मध्य.सह बँक लि नाशिक शे | ५०००.०० |
| संगणक निधी | १९४७२५.०० | पोस्ट ऑफिस पी पी एफ खाते चांदवड | २०२६४४.०० |
| इलेक्ट्रीकल निधी | १११८९५.०० | दि चांदवड मर्चन्टस को ऑप बँक चांदवड | ७५२३७८०.०० |
| धर्मदाय निधी | ७७८२९.०० | कॉसमॉस बँक मुदत ठेव | २००००००.०० |
| सुरक्षा यंत्रणा निधी | १८६१०४.३२ | **कर्ज** | **४७३०६२०४.००** |
| **देणी व तरतुद** | **६३६८५०६.६५** | सामान्य कर्ज | ३५१३७६५.०० |
| ऑडिट फी देणे | ७६४४७.०० | वाहन तारण कर्ज | ५३९००१०.०० |
| शिक्षण निधी देणे | १००००.०० | व्यवसायीक मॉरगेज कर्ज | ८७२९२३६.०० |
| मुदत ठेवीवरिल व्याज देणे | ३०३९९०९.०० | नजर गहान कॅश केडिट कर्ज | १८५४८८५.०० |
| व्यवसाय कर देणे | ९५०.०० | सोने चांदी तारण कर्ज | १४२६५५८५.०० |
| आयकर तरतुद | १३०.०० | मुदत ठेव तारण कर्ज | ३५३८९९०.०० |
| एन पी ए तरतुद | ५१०९७२.६५ | गृहबांधणी कर्ज | ७२५९३५५.०० |
| सेवक सानुग्रह अनुदान | १०६६००.०० | टर्म लोन | २७५४३७८.०० |
| अनामत खाते | ५४०००.०० | **इतर येणे** | **७२१६९१.००** |
| पी पी एफ देणे खाते | २०२६४४.०० | टेलिफोन अनामत खाते | २०००.०० |
| तांत्रिक विकास निधी | २४००००.०० | गुंतवणुकिवरील येणे व्याज | ७१९६९१.०० |
| सभासद भेट वस्तु वितरण तरतुद१ | ६९६४२५.०० | **कायम मालमत्ता** | **३९६४८०.००** |

# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.चांदवड
## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/0३/२0१७ अखेर

| भांडवल व देणी | | मालमत्ता व येणी | |
|---|---|---|---|
| कर्मचारी भविष्य निर्वाह निधी देणे | ३३५२९३.00 | कायम मालमत्ता खाते | ३९६४८0.00 |
| आकस्मित खर्च तरतुद | ८0000.00 | **डेडस्टॉक** | **२५५६७८.00** |
| सेवक कल्याण निधी | १४५९00.00 | डेडस्टॉक खाते | २५५६७८.00 |
| सशस्त्र सेना ध्वज निधी | ५२00.00 | | |
| महात्मा फुले संजीवनी योजना | ५६४0३६.00 | | |
| उत्तम जिंदगी तरतुद | ३00000.00 | | |
| **इतर येणे** | **१0७८११.00** | | |
| चेक कलेक्शन खाते | १0७८११.00 | | |
| एकुण नफा | १२२0000.00 | | |
| | ७७८४३८७२.५४ | | ७७८४३८७२.५४ |

## महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड
## नफा तोटा पत्रक दिनांक ३१/0३/२0१७ अखेर

| खर्च | | उत्पन्न | |
|---|---|---|---|
| **इतर खर्च** | १0९९४९६.३२ | **इतर उत्पन्न** | २२२५.00 |
| किरकोळ खर्च | २७७४५.00 | नोटीस खर्च जमा | ११00.00 |
| प्रवास खर्च | १५५0.00 | फॉर्म फी | ११२५.00 |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १७३१0.00 | **व्याज उत्पन्न खाते** | ७२४८९५८.00 |
| ग्रामपंचायत कर | ३६५0.00 | वाहन तारण कर्जावरील व्याज जमाह्यउत्प | १0१५१७0.00 |
| व्यवसाय कर खर्च | ७५0.00 | मॉरगेज व्यवसायीक व्याज जमा उत्पन्न | ११५६४४५.00 |
| जाहिरात खर्च खाते | २८000.00 | नजरगहाण कॅश केडीट व्याज जमा उत्पन | ३८१५९५.00 |
| लॉकर भाडे | ४000.00 | सोने चांदी कर्जावरील व्याज जमा उत्पन्न | २00४0६९.00 |
| ऑडिट फि खर्च | ५0000.00 | मुदत ठेव तारण व्याज जमाह्यउत्पन्नह | ५७0२२५.00 |
| घसारा खर्च | १0८३३४.00 | गृहबांधणी कर्जावरील व्याज जमाह्यउत्पन | ८९७७८४.00 |
| मानधन खाते | ९७000.00 | दंड व्याज खाते | १३.00 |
| दुरूस्ती व देखभाल खर्च खाते | ११७0४.00 | टर्म लोनवरिल व्याज | ५0७३८२.00 |
| वकिल फी खर्च खाते | १७५00.00 | सामान्य कर्जावरिल व्याज | ७१३३३४.00 |
| भविष्य निर्वाह निधी | ३६000.00 | वैयक्तीक कर्जावरील व्याज जमा उत्पन्न | २९४१.00 |
| इतर खर्च | २४६0.00 | **गुंतवणुकिवरील व्याज** | १३५९७१२.00 |
| वॉचमन खर्च खाते | १२00.00 | गुंतवणुकिवरील व्याज खाते | १३५९७१२.00 |
| चहापान खर्च | ७३७.00 | **डि.डि.कमिशन** | २७५.00 |
| उतम जिंदगी तरतुद खर्च | २00000.00 | डि.डि.कमिशन | २७५.00 |
| संगणक निधी खर्च | ५0000.00 | **प्रवेश फि** | १0.00 |
| वोर्ड व स्टाफ टेनिंग फंड खर्च | २५000.00 | प्रवेश फी | १0.00 |
| महात्मा संजीवनी योजना निधी खर्च | १00000.00 | **बॅंक चार्जेस** | ४८८९.३२ |
| सुरक्षा यंत्रणा निधी खर्च | १८६१0४.३२ | बॅंक चार्जेस | ४८८९.३२ |
| पोस्टेज व टेलिफोन खर्च | २८८५२.00 | | |
| लाईट बिल खर्च | ३८१५0.00 | | |
| प्रिंटिंग व स्टेशनरी | ६३४५0.00 | | |
| **व्याज खर्च खाते** | ५७२0५७३.00 | | |
| जेष्ठ नागरिक ठेवीवरिल व्याज | २४९६0८३.00 | | |
| मुदत ठेवीवरील व्याज खर्च | ३0६१४0७.00 | | |
| वचत ठेवीवरील व्याज खर्च | १६३0८३.00 | | |
| **पगार खाते** | ५७६000.00 | | |
| पगार खाते | ५७६000.00 | | |

# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.चांदवड

## नफा तोटा पत्रक दिनांक ३१/0३/२0१७ अखेर

| खर्च | | उत्पन्न | |
|---|---|---|---|
| ताळेबंद कडे एकुण नफा | १२२0000.00 | | |
| | ८६१६0६९.३२ | | ८६१६0६९.३२ |